# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

D+
१०|७|२४
११:४०

दिनांक : १५/०७/२०२४

# प्रेसनोट

उल्हासनगर शहरात मा.आयुक्त तथा प्रशासक डॉ. अझीझ शेख यांनी दि.१५/०७/२४ रोजी ०४:०० वाजता शहरातील रस्त्यांची पाहणी केली असता रस्त्यावर महापालिकेतर्फे बुझविण्यात आलेले खडडे पुन्हा तसेच पूर्ववत असल्याचे दिसले. त्यामुळे मा. प्रशासक तथा आयुक्त यांनी खडडे बुजविणे बाबत विशेष बैठक स्थायी समिती सभागृहात बैठक घेतली.

सदर बैठकीला सार्व.बाधंकाम विभागाचे अभियंता तसेच प्रभाग अधिकारी गणेश शिंपी, मनिष हिवरे, दत्तात्रय जाधव, अनिल खतुरानी, तसेच मुख्य लेखा अधिकारी किरण भिलारे, मुख्य लेखा परिक्षक शरद देशमुख, जनसंपर्क अधिकारी छाया डांगळे इ. उपस्थित होते.

सदर बैठकीत महापालिका आयुक्तांनी खालीलप्रमाणे संबंधितांना निर्देश दिले.

रस्त्यावर महापालिका प्रशासनामार्फत ज्या ठिकाणी खड्डे बुझविण्यात आलेले आहे पुन्हा त्याच ठिकाणी खड्डे पडल्याचे दिसून आले. खड्डे बुझविण्याच्या मटेरियल मध्ये बदल करून योग्य मटेरिअल वापरून खड्डे बुजविण्यात यावेत म्हणजे ते मटेरिअल पावसाच्या पाण्याने वाहून जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच उल्हासनगर शहरामध्ये एम.एम.आर.डी.ए. मार्फत ७ रस्त्यांचे काम सुरु झाले असून प्रभाग अधिकारी गणेश शिंपी यांनी उल्हासनगर ४ व ५ या ठिकाणच्या रस्त्यांचे एका बाजूचे काम झालेले असून दुसऱ्या बाजूचे काम तसेच राहिले आहे. व दुसऱ्या बाजुस मोठ्या प्रमाणात खड्डे पडुन पाणी साचले आहे, याबाबत मा.आयुक्त यांनी हे काम एम.एम.आर.डी.ए. यांचेकडूनच करण्यात येत असून यावावत एम.एम.आर.डी.ए. च्या प्रमुख यांना पत्र लिहून कळवावे व सदरचे काम त्यांचेकडूनच त्वरीत करुन घ्यावे असे संबंधितांना सुचित केले.

१६ जुलै पासून उल्हासनगर-१, व ३१ जुलै पासुन उल्हासनगर-५ येथे चालीया सुरु होत असल्याने सदर ठिकाणचे रस्ते वाहतुकीसाठी सुरळीत करुन घेण्यात यावे असे सुचविले.

पावसामुळे नदी नाल्यांची पाण्याची पातळी वाढत असल्याने नदीकिनारी राहत असलेल्या लोकांना पाण्याची पातळी OVERFLOW होण्या अगोदरच त्यांना महापालिकेने नियोजन केलेल्या ठिकाणी स्थलांतरीत करावे असे नागरिकांना सुचित करावे असे प्रभाग अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

तसेच झाडे पडणे, इमारत कोसळणे याबाबत सर्व संबंधितांनी पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

१६/७/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

CamScanner